## जळगाव जिल्ह्यातील चोपडा शहरात अवैध रित्या १००तलवारी बाळगणारा स्थानिक गुन्हे शाखेने रंगेहात पकडून मुसक्या आवळल्या

दिनांक -१६/०२/२०१६ रोजी पोलिस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांना गोपनिय बातमिदारामार्फत बातमी मिळाली की, मुकेश मोहनलाल शर्मा, रा.भावसार गल्ली, चोपडा हा शिरपुर येथुन चोपडा कडेस त्याचे कब्जातील मारोती ८०० क्र. जीजे १२ पी ९६०९ हिचेत तलवारी बाळगुन आहे.

वरप्रमाणे नमुद मिळालेल्या माहिती नुसार मा. पोलिस अधिक्षक जळगाव डॉ.जालिंदर सुपेकर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेशसिंह चंदेल स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांचे पथक चोपडा गावी जावुन भावसार गल्ली भागातील मुकेश मोहनलाल शर्मा याचे घराजवळ जावुन सापळा रचुन त्यास त्याब्यात घेतले असता त्याचे ताब्यात मारोती ८०० क्र जीजे १२ पी ९६०९ सह मिळुन आल्याने सदर गाडिची झडती घेतली असता तिचे मागील बाजुचे शिटवर तीन गोणपाटामध्ये एकुण १०० (शंभर) तलवारी ५०हजार रुपये किमतीच्या मिळुन आल्याने मुकेश मोहनलाल शर्मा, वय ३९, धंदा व्यापार, रा.भावसार गल्ली, चोपडा यास त्याचे ३० हजार रुपये किमताची मारोती ८०० क्र जीजे १२ पी ९६०९ वाहनासह ताब्यात घेवुन त्याचेविरुदध्द चोपडा शहर पोलीस स्टेशन येथे भा.ह.का.क. ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा | जळगाव |
| २ | पो.स्टे. | चोपडा |
| ३ | गुरन. | /२०१६ भा.ह.का.क.४/२५ प्रमाणे |
| ४ | गुन्हा घडला दिनांक /वेळ | दिनांक -१६/०२/२०१६ रोजी |
| ५ | गुन्हा दाखल दिनांक /वेळ | दिनांक - १६/०२/२०१६ रोजी |
| ६ | घटनास्थळ | भावसार गल्ली, चोपडा येथे |
| ७ | गेला माल | -- |
| ८ | मिळाला माल | ५०,०००/- रु. किमतीचे १००(शभर) तलवारी<br>३०,०००/- रु. किमतीची मारोती ८०० गाडी क्र जीजे १२ पी ९६०९ |
| ९ | वापरलेले वाहन | मारोती ८०० क्र जीजे १२ पी ९६०९ |
| १० | आरोपीतांचे नाव | १) मुकेश मोहनलाल शर्मा, वय ३९, धंदा व्यापार, रा.भावसार गल्ली, चोपडा |



